# प्रत्येक क्षेत्रात गोव्यातील माणसांचा ठसा : पर्रीकर

‘‘गोव्याची माणसं आणि मासळी हे वेगळंच रसायन आहे. तिथली माणसं साधी-भोळी आहेत. मंत्रिपद महत्त्वाचे आहेच, पण गोव्यात राहायला मनापासून आवडते,’’ अशा शब्दांत संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी पुणेकरांशी गुरुवारी मनमोकळा संवाद साधला; तसेच संगीत, नाटक, साहित्य, खेळ, शास्त्र आदी क्षेत्रांत गोव्यातील माणसांनी स्वतःचा ठसा उमटविल्याचे गौरवोद्‌गारही त्यांनी काढले.

‘समदा’ प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ‘माझ्या गोव्याच्या भूमीत’ या पुस्तकाचे प्रकाशन पर्रीकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी ‘शाळेतील दिवस’ या पुस्तकाचे प्रकाशन केले. मनस्विनी प्रभुणे यांनी ही दोन्ही पुस्तके संपादित केली आहेत. या वेळी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य आणि ‘बुकगंगा’चे मंदार जोगळेकर उपस्थित होते.

‘‘राजकारणात येईल असे मला कधीच वाटले नव्हते. राजकारणात यशस्वी होण्यासाठी पाठबळ नव्हते. त्यामुळे भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांच्याबरोबर गोव्यातील नेतृत्वाचा शोध घेत होतो. अखेर त्यांच्याच आग्रहावरून राजकारणात आलो; पण त्यातही अवघी दहा वर्षे राजकारणात राहणार असल्याची अट होती,’’ असा राजकीय प्रवास पर्रीकर यांनी उलगडला.